**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दिनांक :१८/५/२०२१**

**-:परिपत्र:-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र.१ (के) अन्वये मंगळवार,दि.१८/५/२०२१ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता भरलेल्या माहे मे २०२१ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करून घेण्यात आलेले विषय.**

विषय क्र.१/५८

संदर्भ- १) मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/घन.व्यव./२७ दि.२७/४/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८२, दि.४/५/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन-

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी"स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित "या अशासकिय संस्थेबरोबर एक महिन्यासाठी तात्पुरती करारवाढ करणेकामी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी व शहरातील साफसफाई व स्वच्छता राखण्याच्या दृष्टीने" स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित"या अशासकिय संस्थे बरोबरदि.१३/०५/२०२१पासून पुढील एक महिन्यासाठी तात्पुरती करारवाढ करणेकामी मान्यता मिळणेस.
२) स्वच्छ सहकारी संस्थेला देखरेख व व्यवस्थापन, प्रशिक्षण व नागरिकांमधील जनजागृतीचा खर्च, आवश्यक सेवकवर्गाचे मानधन, महानगरपालिकेशी समन्वय साधणे, क्षेत्रिय कार्यालयांशी समन्वय साधणे, प्रभागनिहाय आरोग्य कोठीवरील सेवकांशी समन्वय साधणे, जनजागृती मोहीम व प्रशिक्षण इ. बाबींसाठी एक महिन्यांच्या कालावधीसाठी र.रु.३२,६१,६०८=३३बजेट तरतुदीप्रमाणे रक्कम अदा करणेस. हा खर्च RE19A164 या अर्थशिर्षकावर नवीन आर्थिक वर्षामध्ये खर्च करणेस.
३) दि.१३/०५/२०२१ पासून पुढील १ महिना कालावधीत ढकलगाडी दुरुस्ती करीता प्रति महिना प्रति कचरा वेचक र.रु.५०/- याप्रमाणे १ महिन्याकरीता र.रु.५०/- आदा करणेस. हा खर्च RE19A125 या अर्थशिर्षकावर नवीन आर्थिक वर्षामध्ये २०२१-२०२२ खर्च करणेस.
४) कचरा वेचकांसाठी आवश्यकतेनुसार सुरक्षा प्रावरणे, ढकलगाड्या व बकेट देणेस. हा खर्च RE19A116 या अर्थशिर्षकावर नवीन आर्थिक वर्षामध्ये खर्च करणेस.
५) अ) वर्गीकृत कचरा गोळा करण्यासाठी प्रत्येक घरापाठीमागे रु. ७०/- दर महा इतके शुल्क प्रस्तावित सहकारी संस्थेमार्फत
नागरिकांकडून आकारण्यास.
ब) झोपडपट्टीमध्ये प्रति झोपडी र.रु.५० प्रति महिना झोपडपट्टी धारकाकडून आकारणेस व प्रत्येक कचरा वेचकास प्रति
झोपडी प्रति महिना र.रु.१०/- प्रोत्साहन भत्ता म्हणून देणेस.
क) व्यावसायिकांकडून निर्माण होणा-या कच-याचे संकलन करणेसाठी दरमहा
र.रु.१४०/- इतके शुल्क आकारणेस.

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.**

विषय क्र.२/५९

संदर्भ- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सा.प्र./१०००,दि.९/३/२०२१ चे पत्र
२) विधी समिती सभा ठराव क्र. ४२ दि.३०/३/२०२१
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८३, दि.४/५/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

सन २०२०-२१ या अंदाजपत्रकामध्ये विविध सार्वजनिक संस्थांचे नावे मान्य झालेल्या देणगीची रक्कम अदा करणेबाबतच्या मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या सार्वजनिक संस्थांना खालील बाबींची पूर्तता केल्यानंतर रक्कम आदा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) संबंधित संस्थेच्याव्यवस्थापक मंडळावर मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे पुणे मनपाचे दोन प्रतिनिधी अथवा शासकिय अधिकारी यांची नेमणूक करणेस

२) सदर संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर,संस्था ज्या वार्डामध्ये येतअसेल त्या वार्डचे विद्यमान सभासद नेमणेस

३) मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये या संस्थेच्या नावामध्ये चूक/बदल झाला असल्यास,त्यांच्या नाव व पत्ता दुरुस्ती/बदल करणेस.

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.**

<u>विषय क्र.३/६०</u>

संदर्भ- १) महा मेट्रो यांचेकडील पत्र जा.क्र. Maha-Metro/Vanaz/ED/R2/2018/123 दि.२४/११/२०१८

२) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.५६८,दि.२१/०६/२०१९

३) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.२३४६,दि.२७/१२/२०१९

४) महा मेट्रो यांचेकडील पत्र जा.क्र. Maha-Metro/CPM/R2/STN/Nal-stop/2021/LR20255 दि.२७/०२/२०२१ व इकडील आ.क्र.३५७०,दि.०१/०३/२०२१

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्रकल्प)/४३दि.३/५/२०२१ चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८५, दि.४/५/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

महर्षी कर्वे रस्ता एस.एन.डी.टी.कॉलेज समोरील अस्तित्वातील पादचारी लोखंडी पूल महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.यांचेमार्फत काढून घेऊन, पुलाचे साहित्य मध्यवर्ती मुख्य कोठीला जमा करून घेणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.**

<u>विषय क्र.४/६१</u>

संदर्भ- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/५६दि.४/५/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८७, दि.४/५/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे ,पेठ कात्रज स.नं.१३० ते १३३ मधील शासनाच्या ले आऊट मधील कात्रज डेअरीच्या जागेतील दक्षिणोत्तर २४ मी.रूंद डी.पी.रस्त्याने बाधित होणाऱ्या बांधकामांच्या बदल्यात त्याच स्वरूपाचे बांधकाम करण्यासाठी येणाऱ्या खर्चाची र.रू.१,०६,३५,८३६/- इतकी रक्कम मोबदला स्वरूपात कात्रज डेअरीस देण्यासाठी खालीलप्रमाणे मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे ,पेठ कात्रज स.नं.१३० ते १३३ मधील शासनाच्या ले आऊट मधील कात्रज डेअरीच्या जागेतील दक्षिणोत्तर २४ मी.रूंद डी.पी.रस्त्याने बाधित होणाऱ्या बांधकामांच्या बदल्यात त्याच स्वरूपाचे बांधकाम करण्यासाठी येणाऱ्या खर्चाची र.रू.१,०६,३५,८३६/- इतकी रक्कम मोबदला स्वरूपात कात्रज डेअरीस देण्यासाठी खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करावयाच्या तरतुदीस.

| अंदाज पत्रकातील बाब | वर्ग करावयाची रक्कम | अंदाज पत्रकातील बाब | अधिक खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, भवन खाते नव्याने समाविष्ट झालेल्या गावातील शाळांमध्ये दुरुस्ती व सुधारणाकामे करणे (CE12A422/J2-21) पान नं.२२७ | र.रु.७५.०लक्ष | भवन खाते पुणे,पेठ कात्रज स.नं.१३० ते १३३मधील शासनाच्या ले आउट मधील कात्रज डेअरीच्या जागेतील दक्षिणोत्तर २४ मी.रुंद डी पी रस्त्याने बाधित होणाऱ्या बांधकामांच्या बदल्यात.रु.१,०६,३५,८३६/- इतकी रक्कम मोबदला स्वरुपात कात्रज डेअरीकडे वर्ग करणे | र.रु.१,०६,३५,८३६.० |
| मनपाच्या ताब्यात आलेल्या व असलेल्या जमिनीवर कंपाऊंड करणे (CE22A573+) पान नं.२३७ | र.रु.३१,३५,८३६.० | | |

२) रस्ता रूंदीने बाधित जागा कात्रज डेअरीमार्फत पुणे मनपाच्या ताब्यात आल्यानंतर र.रू.१,०६,३५,८३६/- **पुणे जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित** यांचे नावे आदा करणेस.

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.**

विषय क्र.५/६२

संदर्भ- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/४९ दि.४/५/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८८, दि.४/५/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे महानगरपालिकेच्या विविध DCH ( Dedicated Covid Hospital )कामी कोटेशन मागविण्यात आली असून कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या दरांचे अवलोकन केले असता Noccarc Robotics Private Ltd.यांनी इतर दोन पुरवठाधारकांपेक्षा सर्वात कमी दर दिला असल्याने त्यांचेकडून प्रति एक नग व्हेंटिलेटर जीएसटी करासह रक्कम रूपये३,२४,८००/- प्रमाणे २० नगांची खरेदी रक्कम रूपये ६४,९६,०००/- ( अक्षरीरक्कम रूपये चौसष्ट लाख शहानव हजार फक्त ) पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम६७ (३) (क) अन्वये व्हेंटिलेटर्स खरेदी करण्यात येणार असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अर्थशिर्षक सन २०२१- २२
RE31F/R5-167
महापौर विकास निधी
मान्य तरतूद रक्कम रूपये २१,००,००,०००/- पैकी ६४,९६,०००/-

विषय क्र.६/६३

संदर्भ- १) मा.दोडके सचिन शिवाजी, सभासद पुणे मनपा यांचे दि.०३/०५/२०२१ चे पत्र
२) महापालिका सहाय्यक आयुक्त,वारजे कर्वेनगर कार्यालय जा.क्र.५८९ दि.०३/०५/२०२१
३) मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/५५ दि.४/५/२०२१ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८९, दि.४/५/२०२१

----

मा.अति.महा.आयुक्त (ज)यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

वरील संदर्भांकित मा.दोडके सचिन शिवाजी, सभासद पुणे यांच्या पत्राच्या अनुषंगाने वारजे येथे चालु होतअसलेल्या कोविड केअर सेंटरसाठी आवश्यक लागणा-या निधीकरीता सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील स यादीतील निधी वर्गीकरण करणाबाबत कळविले आहे. सदर उपलब्ध तरतूदीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बजेटकोड | कामाचेनाव | निधी |
|---|---|---|---|
| १ | CE20A1262/SA15-1452 | प्रभाग क्र.३२ ड मध्ये विविध रस्ते ग्राउट करणे | २०.०० लक्ष |
| २ | CE20A1262/SA15-1457 | प्रभाग क्र.३२ ड मध्ये गणेशपुरी सोसायटी येथे ट्रिमिक्स पद्धतीने कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० लक्ष |
| ३ | CE20A102/SA2-1783 | प्रभाग क्र.३२ ड मध्ये डि.पी.रस्ते विकसीत करणे | २०.०० लक्ष |
| ४ | FE1401/SG1-438 | प्रभाग क्र.३२ ड मध्ये रामनगर वैद्य वस्ते येथे ड्रेनेजलाईन टाकणे | १०.०० लक्ष |

उपरोक्त कामांची क्षेत्रिय कार्यालयाकडून कोणतीही निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.
तरी वरील वर्गीकरणाचे प्रस्तावास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभकडे शिफारस आहे.

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.**

विषय क्र.७/६४

संदर्भ- १) मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या व मा.सुनील गायकवाड यांचे दि. ४/५/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२, दि.४/५/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. ३२ क मध्ये एक ॲम्ब्युलन्स (ऑक्सिजन सहित) खरेदी करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १००, अ.क्र. ६, शहरात भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे-१०), पान क्र. २४४, बजेट कोड – CE22A5448/SJ10-3064, प्रभाग क्र. ३२ क मध्ये विविध ठिकाणी म्युरल करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम – प्रभाग क्र. ३२ क मध्ये एक ॲम्ब्युलन्स (ऑक्सिजन सहित) खरेदी करणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यत देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

<u>विषय क्र.८/६५</u>

संदर्भ– १) मा.बाबुराव चांदेरे व मा.सुनील गायकवाड यांचे दि. ४/५/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९३, दि.४/५/२०२१

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र.९ ड मध्ये दोन नवीन अँम्ब्युलन्स (ऑक्सिजन सहित) खरेदी करणेसाठी र.रू. ३५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक,<br>१) १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. ९८, अ.क्र. ८, शहरातील रस्ते काँक्रीटने विकसित करणे, (यादी क्र. एसए-१५), पान क्र.१९०, प्रभाग क्र.९ ड विधाते कॉलनी बाणेर सर्व्हे नं.२३३ मधून ३० मीटर डी.पी. रस्त्यापर्यंत जाणारा रस्ता सिमेंटचा करणे. | २५लाख | --- |
| २) १.मनपा भवन व मनपा इमारती, पान क्र. ९६, अ.क्र. १, शहरात विविध ठिकाणी मनपासाठी इमारती बांधणे व विकास कामे करणे(यादी क्र. क्र.एसजे १), पान क्र.२२६, प्रभाग क्र.९ ड मध्ये महानगरपालिकेच्या विविध वास्तूंची दुरूस्ती करणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम – प्रभाग क्र.९ ड मध्ये दोन नवीन अँम्ब्युलन्स (ऑक्सिजन सहित) खरेदी करणे | --- | ३५लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

<u>विषय क्र.९/६६</u>

वारजे येथील जनरल हॉस्पीटल व मेटनेटिव्ह हॉस्पीटल येथे ऑक्सिजन युक्त अम्ब्युलन्स खरेदी करणेसाठी र.रू.२० लाखाचे वर्गीकरण करणेबाबत मा.दिलीप बराटे व मा.सुनिल गायकवाड यांचे दि.११/५/२०२१ चे पत्र.

<u>विषय क्र.१०/६७</u>

प्रभाग क्र.४०ब,मध्ये एक ॲम्ब्युलन्स ( ऑक्सीजन सहीत ) खरेदी करणेसाठी र.रू.२० लाखाचे वर्गीकरण करणेबाबत मा.श्रीमती अमृता बाबर यांचे दि.७/५/२०२१ चे पत्र.

<u>विषय क्र.११/६८</u>

पुणे पेठ बाणेर स.नं.३३,येथे एकूण २०९ बेडचे ऑक्सिजन हॉस्पीटल उभारण्याकामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क नुसार पुणे मनपाकडे सी.एस.आर.फंडामध्ये जमा करण्यात आलेल्या रक्कम मधून ऑक्सिजन पाईपलाईन यंत्रणेचे काम र.रू.११०.०० लक्ष पर्यंत करून घेण्यास व सदर खर्चाची माहिती मा.मुख्य सभेकडे सादर करण्याबाबत मा.महा.आयुक्त यांच जा.क्र.मआ/शहर अभि./६२,दि.७/०५/२०२१ चे पत्र.

<u>विषय क्र.१२/६९</u>

पुणे मेट्रो रेल प्रकल्पाच्या स्वारगेट ते कात्रज ( टप्पा क्र.२) या वाढीव भुयारी मेट्रो मार्गिकेचे कामास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुअ(प्रकल्प)/६४,दि.१०/५/२०२१ चे पत्र,

<u>विषय क्र.१३/७०</u>

प्रभाग क्र.१७अ, मध्ये एक नविन ॲम्ब्युलन्स ( ऑक्सिजन सहित ) खरेदी करणेसाठी र.रू.२० लक्षाचे वर्गीकरण करणेबाबत मा.श्रीमती लक्ष्मी आंदेकर व मा.सुनिल गायकवाड यांचे दि.१८/५/२०२१ चे पत्र.

<u>विषय क्र.१४/७१</u>

प्र भाग क्र.८अ,मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू.४० लाखाचे वर्गीकरण करणेबाबत मा.सौ.सुनिता वाडेकर, उपमहापौर यांचे दि.१८/५/२०२१ चे पत्र.

<u>विषय क्र.१५/७२</u>

प्रभाग क्र.१२ड,मध्ये विविध विकासाची कामे करणेसाठी र.रू.५ कोटीचे वर्गीकरण करणेबाबत मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि.१८/५/२०२१ चे पत्र.

<u>विषय क्र.१६/७३</u>

पुणे महानगरपालिकेच्या दळवी हॉस्पीटलमध्ये ऑक्सिजन जनरेटिंग प्लॅन्टच्या बॅकअपकरीता २०० के.व्ही.ए.क्षमतेचा डिझेल जनरेटर पुरविणे हे काम सी.एस.आर.निधीमधून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) नुसार मे.जे.व्ही.एस.इंजिनिअरींग यांचे कडून र.रू.११,८०,०००.०० पर्यंत आठ दिवसाच्या मुदतीत करून घेणेस व सदरची बाब मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाब मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/७९, दि.१२/५/२०२१ चे पत्र.

<u>विषय क्र.१७/७४</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतुदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये पुणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी हॉस्पीटल येरवडा येथील कोव्हीड -१९ सेंटर येथे १० के.एल.क्षमतेची क्रायोजनिक लिक्विड ऑक्सीजन टँक पुरविणे, बसविणे व तद्नुषंगिक कामे करणे.हे काम मे.स्पार्क इंडस्ट्रीज यांचे कडून र.रू.४१,७७,५९८.१७ पर्यंत कामे करून घेणेबाबतची बाब मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/८०, दि.१२/५/२०२१ चे पत्र.

<u>विषय क्र.१८/७५</u>

महापालिकेच्या नायडू हॉस्पीटलमध्ये ऑक्सिजन जनरेटींग प्लॅन्ट बसविणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) (क) नुसार मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शहर अभि./८७, दि.१७/५/२०२१ चे पत्र.

<u>विषय क्र.१९/७६</u>

पर्वती मतदार संघातील पुणे महानगरपालिकेच्या रूग्णालयांना व्हेंटिलेटर Noccarc Robotics Private Ltd यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) अन्वये खरेदी करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/८९, दि.१७/५/२०२१ चे पत्र.

<u>विषय क्र.२०/७७</u>

संदर्भ- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/८२, दि. १४/५/२०२१ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२८, दि.१८/५/२०२१

विषय- पुणे महानगरपालिका आस्थापनावरील अभियांत्रिकी संवर्गातील कार्यकारी अभियंता (विद्युत) वर्ग-१ या पदावरून अधिक्षक अभियंता (विद्युत ) वर्ग-१ या पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत.

----

मा. महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रामध्ये दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील अधिक्षक अभियंता (विद्युत) वर्ग -१ (वेतन श्रेणी - १५६०० - ३९१०० + ग्रेड पे ७६०० (शासनाप्रमाणे)+ मान्य भत्ते) या पदाची रिक्त पदे तदर्थ पदोन्नतीने भरणेसाठी पदोन्नती समितीने शिफारस केलेल्या निवडयादीस तसेच शासनाकडील वेळोवेळी प्राप्त होणारे आदेश व आस्थापना विषय बाबींचा विचार करून खालील निवड यादीवरील सेवक यांची तदर्थ पदोन्नतीने नेमणुक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(१) नुसार मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>निवड यादी</u>

| अ. क्र. | सेवकाचे नाव | जाताची प्रवर्ग | नेमणुकीचा प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | जन्मदिनांक | कार्यकारी अभियंता पदावरील दिनांक | सेवानिवृत्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. रामदास निवृत्ती तारू | भज-ब | ज्येष्ठतेनुसार | बी.ई.(वि) | २४/०६/१९६९ | ०१/०४/२०१२ | ३०/०६/२०२७ |

**विषय क्र.२१/७८**

संदर्भ- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/८३, दि. १४/५/२०२१ चे पत्र

२) मा. सौ. मनिषा लडकत व मा. सौ. स्वाती लोखंडे याची दि. १८/०५/२०२१ ची उपसूचना.

३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२९, दि.१८/५/२०२१

विषय- पुणे महानगरपालिका आस्थापनावरील अभियांत्रिकी संवर्गातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) वर्ग-१ या पदावरून अधिक्षक अभियंता (स्थापत्य) वर्ग-१ या पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत.

----

मा. महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रामध्ये दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील अधिक्षक अभियंता (स्थापत्य) वर्ग -१ (वेतन श्रेणी - १५६०० - ३९१०० + ग्रेड पे ७६०० (शासनाप्रमाणे)+ मान्य भत्ते) या पदाची रिक्त पदे तदर्थ पदोन्नतीने भरणेसाठी पदोन्नती समितीने शिफारस केलेल्या खालील निवड यादीस व प्रतिक्षायादीस तसेच शासनाकडील वेळोवेळी प्राप्त होणारे आदेश व आस्थापना विषय बाबींचा विचार करून खालील सेवक यांची तदर्थ पदोन्नतीने नेमणुक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(१) नुसार मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## निवड यादी

| अ. क्र. | सेवकाचे नाव | जाताची प्रवर्ग | नेमणुकीचा प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | जन्मदिनांक | कार्यकारी अभियंता पदावरील दिनांक | सेवानिवृत्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. गंभिरे नामदेव देवराम | अज | ज्येष्ठतेनुसार | बी.ई.(सि) | ०१/०६/१९६३ | १४/०६/२०११ | ३१/०५/२०२१ |
| २. | श्री. तांदळे संतोष श्रीकृष्ण | खुला | ज्येष्ठतेनुसार | बी.ई.(सि) | १४/०६/१९६८ | १०/०९/२०१२ | ३०/०६/२०२६ |
| ३. | श्री. हरिभक्त केशव विशाल | अजा | ज्येष्ठतेनुसार | बी.ई.(सि) | १२/०५/१९६९ | ०१/०८/२००८ | ३१/०५/२०२७ |
| ४. | श्रीमती शिर्के सुष्मिता दामोदर | भज-ब | ज्येष्ठतेनुसार | बी.ई.(सि) | ०२/०४/१९६५ | ०५/१२/२०११ | ०३/०४/२०२३ |
| ५. | श्री. कडु सुदेश वामनराव | खुला | ज्येष्ठतेनुसार | बी.ई.(सि) | १९/१०/१९६५ | ०३/०१/२०१२ | ३१/१०/२०२३ |

## प्रतिक्षा यादी

| अ. क्र. | सेवकाचे नाव | जाताची प्रवर्ग | नेमणुकीचा प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | जन्मदिनांक | कार्यकारी अभियंता पदावरील दिनांक | सेवानिवृत्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. जोशी प्रसन्नराघव मधुकर | खुला | ज्येष्ठतेनुसार | बी.ई.(सि) | ०३/०२/१९६८ | ०६/०९/२०१३ | २८/०२/२०२६ |
| २. | श्रीमती सबनीस मीरा श्रीनिवास | खुला | ज्येष्ठतेनुसार | बी.ई.(सि) | ३०/०६/१९६५ | १५/०३/२०१६ | ३०/०६/२०२३ |
| ३. | श्री. कदम सुधीर माणिकराव | खुला | ज्येष्ठतेनुसार | बी.ई.(सि) | ०६/०१/१९६५ | १५/०३/२०१६ | ३१/०१/२०२३ |

संदर्भ क्र. २ च्या उपसुचनेनुसार श्री. साहेबराव बलभीम दांडगे, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे नाव अधिक्षक अभियंता (स्थापत्य) पदासाठी पदोन्नती प्रतिक्षा यादीत समाविष्ठ करण्यात यावे.

**विषय क्र.२२/७९**

संदर्भ- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/८४, दि. १४/५/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३०, दि.१८/५/२०२१

विषय- पुणे महानगरपालिका आस्थापनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील अधिक्षक अभियंता (स्थापत्य) वर्ग-१ या पदावरून मुख्य अभियंता (स्थापत्य) वर्ग-१ या पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत.

----

मा. महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रामध्ये दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील अधिक्षक अभियंता (स्थापत्य) वर्ग -१ (वेतन श्रेणी - ३७४०० - ६७००० + ग्रेड पे ८७०० (शासनाप्रमाणे)+ मान्य भत्ते) या पदाची रिक्त पदे तदर्थ

पदोन्नतीने भरणेसाठी पदोन्नती समितीने शिफारस केलेल्या खालील निवड यादीस व प्रतिक्षायादीस तसेच शासनाकडील वेळोवेळी प्राप्त होणारे आदेश व आस्थापना विषय बाबींचा विचार करून उपरोक्त सेवक यांची तदर्थ पदोन्नतीने नेमणुक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(१) नुसार मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>निवड यादी</u>

| अ. क्र. | सेवकाचे नाव | जाताची प्रवर्ग | नेमणुकीचा प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | जन्मदिनांक | अधिक्षक अभियंता पदावरील दिनांक | सेवानिवृत्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. मदन रामचंद्र अढारी | अज | ज्येष्ठतेनुसार | बी.ई.(सि) | ०५/०६/१९६३ | १४/०१२/२००७ | ३०/०६/२०२१ |

<u>प्रतिक्षा यादी</u>

| अ. क्र. | सेवकाचे नाव | जाताची प्रवर्ग | नेमणुकीचा प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | जन्मदिनांक | अधिक्षक अभियंता पदावरील दिनांक | सेवानिवृत्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. राजेंद्र वसंत राऊत | खुला | ज्येष्ठतेनुसार | बी.ई.(सि) | १३/०७/१९६४ | ०५/०९/२०१३ | ३१/०७/२०२२ |

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**